# महाराष्ट्र शासन
# भूमी अभिलेख विभाग

महसूल व वन विभागाकडील शासनमान्यता पत्र क्रमांक : राभूअ २०१९/प्र.क्र.५५/ई-६, दिनांक २०.०७.२०२१ नुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म. राज्य) पुणे व उपसंचालक भूमी अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयांतील खालील रिक्त पदे भरण्याकरिता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी विहित अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून सर्वात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. भरावयाच्या पदांचा तपशील
विभाग : कोंकण प्रदेश, मुंबई
पदाचे नाव व वेतनश्रेणी : भूकरमापक तथा लिपिक
वेतनस्तर : एस-६ (रु. १९९००-६३२००)

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | खेळाडू | अंशकालीन | अनाथ | समांतर आरक्षण विरहित | |
| १ | अनु. जाती | ७ | २ | १ | १४ | २ | ५ | ० | १६ | ४७ |
| | अनु. जमाती | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ४ | ८ |
| | वि.जा. अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ३ | ७ |
| | भ.ज. ब | २ | १ | ० | ३ | १ | १ | ० | २ | १० |
| | भ. ज. क | २ | १ | ० | ५ | १ | २ | ० | ५ | १६ |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | १ | ५ |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | २ | ० | १ | ० | ३ | ७ |
| | इ.मा.व. | ८ | ३ | १ | १६ | ३ | ५ | १ | १५ | ५२ |
| | ईडब्ल्यूएस | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ० | ७ | २५ |
| | अराखीव | १० | ३ | १ | २० | ३ | ७ | १ | २२ | ६७ |
| | **एकूण** | **३७** | **११** | **४** | **७४** | **११** | **२७** | **२** | **७८** | **२४४** |
| | दिव्यांगांकरिता राखीव- एकूण १० (अल्पदृष्टी- ०३, श्रवणदोष- ०३, अस्थिव्यंग- ०२, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग- ०२) | | | | | | | | | |

२. **विहित शैक्षणिक अर्हता :**
उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दिनांक ३१.१२.२०२१) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | अर्हता/अनुभव |
|---|---|---|
| १ | भूकरमापक तथा लिपिक | १) मान्यताप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण केल्यावर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षाचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र.**<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र.<br>उपरोक्त क्र. (२) मध्ये नमूद टंकलेखनविषयक अर्हता पूर्ण करीत नसलेली व्यक्ती सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल. परंतु अशा व्यक्तीने सदर अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत सदर अर्हता धारण न केल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील. |

****केंद्र शासनाच्या मा. महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण क्र. DGE&T-19/06(1)/2014-CD, दिनांक ०४ जुलै २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकविला जाणारा सर्व्हेअर अभ्यासक्रमाचा कालावधी प्रवेश सत्र ऑगस्ट २०१४ पासून एक वर्ष कालावधीचा झालेला आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पूर्ण करून त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार वरील पदाकरिता अर्ज करण्यास तसेच परीक्षेस बसण्यास पात्र असतील. मात्र त्याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार त्यांच्या निवडीबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत शासनाकडील निर्णय अंतिम राहील.**

३. **वेळापत्रक :**

| अ. क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाइन भरण्याचा कालावधी | दिनांक ०९.१२.२०२१ सकाळी १०.०० ते दिनांक ३१.१२.२०२१ रात्री २३.५९ पर्यंत. |
| २ | ऑनलाइन शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ०९.१२.२०२१ ते दिनांक ०१.०१.२०२२ रात्री २३.५९ पर्यंत. |
| ३ | परीक्षेचा प्रस्तावित दिनांक | रविवार, दिनांक २३.०१.२०२२*** |

*****आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भात संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादींबाबत सविस्तर तपशिलासाठी विभागाच्या **https://landrecordsrecruitment2021.in** व **https://mahabhumi.gov.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे अवलोकन करावे.

ऑनलाइन अर्ज वरील संकेतस्थळावर **दिनांक ०९.१२.२०२१ ते ३१.१२.२०२१ पर्यंत** स्वीकारण्यात येतील.

विभागाच्या **https://landrecordsrecruitment2021.in** व **https://mahabhumi.gov.in** या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

स्वाक्षरी/-
(गीता देशपांडे)
सदस्य सचिव,
गट क निवड समिती तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख
संलग्न उपसंचालक भूमी अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२१-२०२२/३०७२